**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

सचिव कार्यालय

दिनांकः- २४/०९/२००८

**प्रति,**

मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम ३( क) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **क्र.१२ गुरूवार दिनांक २५/९/२००८ दुपारी १.००** वाजता स्थायी समिती कार्यालयात खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,

अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १२**

**सन-२००८-२००९**

**गुरूवार दिनांक.२५/९/२००८ ची विषय पत्रिका.**

**विषय क्रं.** **विषय**

**१**. अहमदनगर महानगरपालिकेचे UIDSSMT योजने अंतर्गत केडगांव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजनेच्या शुध्द पाणी पंपीग मशिनरीचा पुरवठा करणे, उभारणी करणे आणि शुध्द पाणी उर्ध्वनलिका अंथरणे, जोडणे, कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ .

२. अहमदनगर महानगरपालिकेचे UIDSSMT योजने अंतर्गत केडगांव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजनेच्या वितरण व्यवस्था अंथरणे, जोडणे इत्यादी तसेच वॉटर मीटर आणि योजना चालविणे, कामी मागविण्यांत आलेल्या निवीदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

नगरसचिव,

अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत**- मा.स्थायी समिती सभा क्रमांक- विषय-क्रमांक १ ते २ च्या प्रस्तावांच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१२**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- १ गुरूवार दिनांक २५/९/२००८

ठराव क्रमांक -१ गुरूवार दिनांक २५/९/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे **UIDSSMT** योजने अंतर्गत केडगांव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजनेच्या शुध्द पाणी पंपीग मशिनरीचा पुरवठा करणे,उभारणी करणे आणि शुध्द पाणी उर्ध्वनलिका अंथरणे, जोडणे, कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना-विषय- UIDSSMT अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजनेच्या खालील कामाच्या प्राप्त झालेल्या कमीचे निविदा धारक ॲक्वा पंपस् प्रा.लि. पुणे यांचे निविदा दरास मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणे बाबत.

१) शुध्द पाणी पंपीग मशिनरीचा पुरवठा करणे, उभारणी करणे आणि शुध्द पाणी उर्ध्वनलिका अंथरणे, जोडणे इ.

अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,१४,७७,८६३/-

**टिप्पणी** : उपरोक्त विषयास अनुसरून विनंती फेरसादर रिपोर्ट की, UIDSSMT योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगाव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजनेच्या वरील कामासाठी वर्तमानपत्रात फेर जाहिर टेंडर नोटीस दि. १६/७/२००८ रोजीच्या दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती.

वरील कामासाठी प्राप्त निविदांपैकी ॲक्वा पंपस् प्रा.लि. पुणे यांचे निविदा दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमीचे प्राप्त झालेले होते. सदरचे दर हे अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ११५% जादाचे व अतिशय अवाजवी असल्याने कमीचे दरधारक यांना दर वाटाघाटी करून कमी करणे विषयी कळविण्यात आलेले होते. या अनुषंगाने मे. ॲक्वा पंपस् प्रा.लि. पुणे यांनी दि. ११/८/२००८ रोजी निविदेच्या अंदाजपत्रकीय निविदेवर ०.५% सुट देत आहोत. म्हणजेच त्यांचे दर ११४.५% राहतील. असे पत्रात नमूद केले होते.

उपरोक्त कामी अहमदनगर महानगरपालिकेचे प्रोजेक्ट मेनेजमेंट कन्सलटंट म्हणून म.जि.प्रा. विभागास नियुक्त केलेले असल्यामुळे प्राप्त झालेल्या दोन्ही निविदांधारकांच्या मूळ निविदा व कागदपत्रे इत्यादी आर्थिक तसेच तांत्रिक पडताळणीसाठी पाठविण्यात आल्या होत्या. सदर निविदेची म.जि.प्रा. कडून छानंनी करण्यात आलेली असून त्यांचे पत्र क्र. २१८१ दि. २१/८/०८ अन्वये चालू दर सूचीनुसार कंत्राटदाराने केलेला देकार हा ८२.८२ % जादा असल्याने कंत्राटदाराबरोबर दर कमी करण्याची कार्यवाही म.न.पा.स्तरावर करणे बाबत सुचित केले होते.

या अनुषंगाने संबंधीत निविदाधारकास दि. २/९/०८ रोजी मा.आयुक्त साहेब यांचे दालनात वाटाघाटीसाठी बोलविण्यांत आलेले होते. त्यानुसार त्यांनी दि. २/९/०८ रोजी सविस्तर लेखी पत्र देवून आणखी ५% सूट देउन्र दर हे ११०% जादा राहतील. असे कळविले. त्यानुसार पुन्हा दि. ८/९/०८ रोजी संबंधीत निविदाधारकाशी मा.आयुक्त साहेब यांचे दालनात समितीसमोर चर्चा केली असता डी.आय. स्पेशलचे बाजारात दर वाढलेले असल्याने निविदेत धरण्यात आलेले डी.आय. स्पेशल च्या Item मुळे दर जादा वाटतात.

त्यासाठी दि.९/९/०८ रोजी म.जि.प्रा. व म.न.पा.चे अधिकारी यांनी ॲक्वा पंपस् प्रा.लि. यांचे कडील इंजिनिअर समवेत प्रत्यक्ष साईटची पाहणी करून डी.आय. स्पेशल हे प्रत्यक्ष साईट नुसार जवळपास २५ टन इतकेच लागण्याची शक्यता असल्याने या अनुषंगाने म.न.पा.चे व म.जि.प्रा. चे उपस्थित अधिका-यां समवेत मा.आयुक्त साहेब यांचे दालनात सदर दिवशी दुपारी पुन्हा वाटाघाटी विषयी संबंधीत निविदा धारकाशी समितीने सविस्तर चर्चा केली. त्यानुसार संबंधीत निविदाधारकांनी १३% सूट देवून फायनल दर हे ९७% जादा इतके राहतील याविषयी दि.९/९/०८ रोजी व पुन्हा दि. २४/९/०८ रोजी दिलेल्या पत्रानुसार ३२.१२ % जादा दरानुसार काम करणेस सहमती दर्शविलेली आहे.

यास्तव उपरोक्त कामी अहमदनगर महानगरपालिकेने प्रोजेक्ट मेनेजमेंट कन्सलटंट म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांध. विभाग अहमदनगर यांचा ॲक्वा पंपस् प्रा.लि. यांनी दि. २४/९/०८ रोजी वाटाघाटी करून निविदेमध्ये भरलेले दर ११५% वरून अंतिम ३२.१२ % जादा पर्यत कमी करणे विषयी दिलेल्या लेखी पत्रानुसार आर्थिक पडताळणी करून सदरची निविदा दर स्विकृत करणे योग्य राहिल. किंवा कसे राहिल याबाबत स्पष्ट अभिप्राय मागविण्यात आला होता.

त्यानुसार ॲक्वा पंपस प्रा.लि. यांनी दि. २४/९/०८ रोजी दिलेल्या पत्रानुसार कमी केलेल्या निविदा दराची [३२.१२% जादा] म.जि.प्रा.कडून पडताळणी करून पत्र क्र. लेखा ३० दि. २४/९/०८ अन्वये सन २००७-२००८ चे दर सुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ९.९३% जास्त आहेत.

या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबतच्या सादर प्रस्तावामध्ये मा.मुख्य लेखाधिकारी, मा.उपायुक्त, व मा.आयुक्त साहेब यांनी PMC महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहमदनगर यांचे अभिप्राया नुसार सदर कामी **ॲक्वा पंपस प्रा.लि. पुणे** यांनी निगोशिएशन नुसार कमी करून दिलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ३२.१२% जास्त परंतु **सन २००७-२००८** च्या **दर सुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ९.९३% जास्तीचे दरास** मंजूरी मा.स्थायी समितीची घेवून पुढील कार्यवाही करावी असे निर्देशित केलेले आहे.

तरी वरील आशयाचा प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजूरी मिळावी ही विनंती.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे. दि.२४/९/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- केडगांव भागाकरितां UIDSSMT अंतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या शुध्द पाणी पंपीग मशिनरीचा पुरवठा करणे, उभारणी करणे, इत्यादी कामी मागविण्यात आलेल्या निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.शेख आरिफ शे.र.:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. तिवारी सु.र.:-सदर योजनेसाठी आवश्यक असलेल्या म.न.पा. हिस्साची रक्कम किती लागणार आहे.

मुख्य लेखा अधिकारी श्री. कर्डीले पी.बी. :- या संपूर्ण योजनेकरितां एकूण खर्च रूपये पांच कोटी पर्यत येणारा असुन त्याकरितांचे म.न.पा. हिस्साची आवश्यक रकमेची तरतुद केलेली आहे.

मा.श्री. तिवारी सु.र.:- तरतुद केलेला निधी आता शिल्लक आहे का ?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- सदरचे UIDSSMT योजने अंतर्गत करावयाच्या केडगाव पाणी पुरवठा योजने मध्ये केंद्र शासनाचा ,महाराष्ट्र शासनाचा हिस्सा व म.न.पा. चा १०% हिस्सा याप्रमाणे खर्चाचा हिस्सा ठरलेला आहे. त्यानुसार आवश्यक ती तरतुद करण्यांत आलेली आहे. सदर योजनेचे काम म.जि.प्रा.चे मार्फत करण्यांत येणार असुन सदरचे कामावर त्यांची देखरेख रहाणार आहे.

मुख्य लेखा अधिकारी श्री. कर्डीले पी.बी. :- आपला म.न.पा.चा हिस्सा म्हणून सदर योजनेसाठी रक्कम रूपये १ कोटी २७ लाखाची हमी दिलेली असुन म.न.पा.ची हमी देणे महत्वाची आहे. म.न.पा. हिस्साची तरतुद केलेली आहे.

मा.श्री. तिवारी सु.र.:- म.न.पा. चा हिस्सा म्हणून आपण १ कोटी २७ लाखाची तरतुद केलेली आहे. सदर योजनेचे कंन्सलटंट तसेच म.जि.प्रा. चे सुपरव्हिजन चार्जेस मुळे सदर योजने करितांचे खर्चात वाढ होईल.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- सदर योजनेचे काम म.जि.प्रा. मार्फत होणार असुन सदरचे कामावर त्याचे सुपरव्हिजन रहाणार आहे. त्यांचे कामाचे टप्प्या नुसारचे सुपरव्हिजन चार्जेस देण्यांत येतात म.जि.प्रा. यांचे सुपरव्हिजन चार्ज योजनेचे एकुण खर्चामधूनच देण्यांत येतात.

मा.श्री. तिवारी सु.र.:- सदर योजनेचे काम वेळेत पूर्ण होईल किंवा कसे.

मुख्य लेखा अधिकारी श्री. कर्डीले पी.बी. :- UIDSSMT या केंद्र शासनाचे योजना एकुण ७ वर्षात पूर्ण करावयाच्या असतात पैकी चार वर्षे झाली आहेत राहिलेल्या तीन वर्षातच सदर योजना पूर्ण करणेची आहे योजनेच्या ठरलेल्या कामाचे टप्प्या नुसार योजनेचे पुढील अनुदान प्राप्त होते.अन्यथा अनुदान मिळत नाही.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- सदर योजनेचे टेंडर मध्ये कामाची मुदत दीड वर्ष दिलेली असुन मुदतीमध्ये काम पूर्ण करणे संबंधीत निविदा धारकावर बंधन कारक असते. सदर केडगाव पाणी पुरवठा योजनेचे टेंडर मागविले असता ते ११५% जास्तीचे आले होते. म्हणजे दहा कोटी रूपयाचे कामासाठी एकुण खर्च २१ कोटी पर्यत येणारे म्हणजे मुळ अंदाजपत्रका पेक्षा एकुण ११ कोटी जास्तीचे खर्च होणारे असे दर प्राप्त झाले परंतु सदर योजनेचे कामासाठी पाईप जोडणे करितां लागणा-या किंवा बेंड करितां वापरण्यात येणारे डी.आय स्पेशल चे मटेरिअल हे अंदाजपत्रक मध्ये जास्त धरले होते . त्यामुळे आलेले दर जास्तीचे होते.परंतु म.जि.प्रा. व म.न.पा.चे अधिकारी यांनी ॲक्वा पंपस प्रा.लि. पुणे यांचे कडील इंजिनिअर समवेत प्रत्यक्ष जागेची पहाणी करून सदरचे डि.आय. स्पेशल हे मटेरिअल प्रत्यक्ष साईट नुसार जवळपास २५ टन इतके लागण्याची शक्य असल्याने त्या अनुषंगाने मा. आयुक्त साहेब यांचे दालनात संबंधीत निविदा धारकाशी सविस्तर चर्चा केली असता निविदा धारकानी ३२.१२% जादा दराने काम करण्यास सहमती दिलेली आहे. त्यांच वेळी आर.सी.रेट ही साईड केल्याचा जी.आर प्राप्त झाल्याने सदर निविदा धारकाने दर कमी केलेले आहेत सदरचे निगोशिएशन नंतरचे सदरचे दर सन २००७-२००८ च्या दरसुची नुसार ९.९३ % जास्तीचे येतात. योजना मुदतीत पूर्ण होईल त्याकरिता येणा-या अडचणी दूर झालेल्या आहेत.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे दरास मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री. शिंदे द.बा.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. दिघे वि.रा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे **UIDSSMT** योजने अंतर्गत केडगांव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजनेच्या शुध्द पाणी पंपीग मशिनरीचा पुरवठा करणे,उभारणी करणे आणि शुध्द पाणी उर्ध्वनलिका अंथरणे, जोडणे, कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे **यु.आय.डी.एस.एस.एम.टी.** योजने अंतर्गत केडगांव प्रभागासाठी चे पाणी पुरवठा योजनेच्या शुध्द पाणी पंपीग मशिनरीचा पुरवठा करणे,उभारणी करणे आणि शुध्द पाणी उर्ध्वनलिका अंथरणे, जोडणे, इत्यादी कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक ॲक्वा पंपस् प्रा.लि. पुणे यांनी निगोशिएशन नुसार कमी करून दिलेल्या अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ३२.१२% ( बत्तीस पुर्णांक बारा शतांश टक्के) जास्तीचे व सन २००७-२००८ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ९.९३ % ( नउ्र पूर्णांक त्र्याण्णव शतांश टक्के) जास्तीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच सदरचे केडगाव पाणी पुरवठा योजना रखडणार नाही याकरितां डी.आय. स्पेशल ही बाब भविष्यात सदस्चे एजन्सीचे मागणी नुसार म.न.पा. मार्फत खरेदी करून देण्यांस हरकत नाही. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

अनुमोदक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१२**

सन २००८-२००९

विषय क्रमांक- २ गुरूवार दिनांक २५/९/२००८

ठराव क्रमांक -२ गुरूवार दिनांक २५/९/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे **UIDSSMT** योजने अंतर्गत केडगांव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजनेच्या वितरण व्यवस्था अंथरणे, जोडणे इत्यादी तसेच वॉटर मीटर आणि योजना चालविणे, कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना-विषय- UIDSSMT अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजनेच्या खालील कामाच्या प्राप्त झालेल्या निविदा दरास मा. स्थायी समितीची मंजूरी मिळणे बाबत.

१) वितरण व्यवस्था अंथरणे, जोडणे इ. वॉटर मीटर आणि योजना चालविणे.
अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३,१५,९८,९८६/-

**टिप्पणी** : उपरोक्त विषयास अनुसरून विनंती पूर्वक सादर की, UIDSSMT योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगाव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजना राबविणेसाठीच्या कामाचे दोन टप्प्यामध्ये वर्गीकरण करून विहीत पध्दतीने वरील कामासाठी वर्तमानपत्रात फेर जाहिर टेंडर नोटीस दि. २२/८/२००८ रोजीच्या दैनिक पुढारी या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

याकामी वेळेत व मुदतीत प्राप्त सिलबंद निविदा दि. १५/९/२००८ रोजी PMC महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहमदनगर. विभागाकडील उपअभियंता, लेखापाल तसेच उपस्थित निविदांधारकांसमोर उघडल्या असता तुलनात्मक दृष्टया मे.एस.एन.एन्टरप्रायईजेस,मुंबई यांचे सदर कामासाठी दर सर्वात कमीचे [ ३९.५०%जास्त] आलेले होते परंतु सदरचे दर हे अतिशय अवाजवी वाटत असल्याने दि. १६/९/०८ रोजी मा.आयुक्त साहेब यांचे दालनात दराबाबत वाटाघाटी करून त्यांनी पत्र देउन निविदा रक्कमेवर ३६.५७% जास्त दराने काम करण्यास सहमती दर्शविलेली आहे. त्यानुसार कमीचे प्राप्त निविदाधारक मे.एस.एन.एन्टरप्रायजेस,मुंबई यांची मूळ निविदा व कागदपत्रे इत्यादी आर्थिक तसेच तांत्रिक पडताळणीसाठी PMC महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहमदनगर यांचेकडे पाठविण्यात आले होते.

या अनुषंगाने PMC महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहमदनगर यांनी विषयांकित कामासाठी प्राप्त निविदाधारक मे.एस.सन.एन्टरप्रायजेस, मुंबई यांची मूळ निविदा व आर्थिक तसेच तांत्रिक कागदपत्राची पडताळणी करून सदर निविदा दराची [ निगोशिएशन नुसार कमी करून दिलेले दर] सन २००७-२००८ च्या दराशी तुलना केली असता प्राप्त निविदा दर हे अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ९.९४% जास्त आहेत.

या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबतच्या सादर प्रस्तावामध्ये मा.मुख्य लेखाधिकारी, मा.उपायुक्त, व मा.आयुक्त साहेब यांनी PMC महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहमदनगर यांचे अभिप्राया नुसार सदर कामी **मे.एस.एन.एन्टरप्रायजेस,मुंबई** यांनी निगोशिएशन नुसार कमी करून दिलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ३६.५७% जास्त परंतु **सन २००७-२००८** च्या **दर सुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ९.९४% जास्तीचे दरास** मंजूरी मा.स्थायी समितीची घेवून पुढील कार्यवाही करावी असे निर्देशित केलेले आहे.

तरी वरील आशयाचा प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजूरी मिळावी ही विनंती.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे. दि.२४/९/०८
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे **UIDSSMT** योजने अंतर्गत केडगांव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजनेच्या वितरण व्यवस्था अंथरणे, जोडणे इत्यादी तसेच वॉटर मीटर आणि योजना चालविणे, कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. शिंदे द.बा.:- ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. दिघे वि.रा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे **यु.आय.डी.एस.एस.एम.टी.** योजने अंतर्गत केडगांव प्रभागांसाठी चे पाणी पुरवठा योजनेच्या वितरण व्यवस्था अंथरणे, जोडणे इत्यादी तसेच वॉटर मीटर आणि योजना चालविणे, कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक मे.एस.एन.एन्टरप्रायजेस,मुंबई यांनी निगोशिएशन नुसार कमी करून दिलेल्या अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ३६.५७% ( छत्तीस पुर्णांक सत्तावन्न शतांश टक्के) जास्तीचे परंतु सन २००७-२००८ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ९.९४ % (नउ पूर्णांक चौ-याण्णव शतांश टक्के) जास्तीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

अनुमोदक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका.